# पिंपरी येथे परराज्यातील पाच लाख रुपयांची दारु जप्त



**पिंपरी (प्रतिनिधी):** पिंपरीत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाईत परराज्यातील पाच लाखांची दारू जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई डिलक्स चौकात शनिवारी (दि.९) करण्यात आली. याप्रकरणी वाहन चालकाला अटक करण्यात आली आहे.निरंजन रामनाथ चव्हाण (वय.३० रा. परंदवाडी, मावळ) असे अटक करण्यात आलेल्या वाहन चालकाचे नाव आहे.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हरियाणा राज्याचा परवाना असलेली पाच लाख रुपयांची दारु पिंपरी परिसरातून जप्त करण्यात आली. ही दारु मारुती सुझुकी (एमएच.१४ एफजी३७०८) कारमधून अवैध रित्या विक्रीसाठी घेऊन जात असल्याची माहीती अधिका–यांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार गुरुद्वारा येथे सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत ५ लाख १३ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सुरज रजतसिंग दाबेराव करत आहेत

# १० के इंटेंसिटी पुणे रन ला जबर्दस्त प्रतिसाद




**पुणे (प्रतिनिधी):** करण सिंग आणि प्रियांका चाउरकर यानी १० के इंटेंसिटी रन पुरूष आणि महिला या गटात अनुक्रमे ३२.५ आणि ४१.४६ मिनिटात पूर्ण करून जिंकली. ही दौड बघण्यासाठी रविवारी पुण्याच्या बेलावाडी कॉम्लेक्स मध्ये खच्चून गर्दी होती। पुणे रन मध्ये विविध क्षेत्रातील स्वत. ची वेगळी चमक आणि ग्लैमर असण्यार्या क्रीडा पटुंची ची या दिमाखदार भागीदारी होती। या बरोबरच पुण्याच्या स्थानिक लोकांचा पण या कार्यक्रमात भरपूर सहभाग होता. पुणे रन नीं यूरोप, साउथ कोरिया आणि आफ्रिका महाद्वीपातल्या अनेक आंतरराष्ट्रीय धावकांना आकर्षिले आहे। या शिवाय पुणे पोलिस ने सुद्धां आपल्या प्रतिनिधीनां या दौड मध्ये भाग घेण्यास खासकरून पाठविले. ह्या प्रतिनिधीनीं 'अ ग्रीन एंड हेल्दी पुणे सिटी' या भावनेला प्रोत्साहन दिले। पुणे दौड मध्ये अनेक प्रख्यात व्यक्तिंनी भाग घेतला। भूतपूर्व ओलंपिक नेमबाज आणि राष्ट्रमंडल खेळात स्वर्ण पदक पटकवणारी अंजली भागवत, भूतपूर्व कुश्तीगीर काका पवार, महाराष्ट्र ओलंपिक एसोसिएशन चे उपाध्यक्ष प्रह्लाद सावंत आणि त्याच बरोबर आमदार भीमराव तपकीर यांनी या हिरवा झेंडा दाखवला। या दौड मध्ये वरिष्ठ राष्ट्रीय धाविका लीलम्मा अलफोंसो या सुद्धा वरिष्ठ गटात सामील झाल्या। या समारंभाबद्दल बोलताना अंजली भागवत म्हणाल्या कि त्यांचं या कार्यक्रमाला पूर्ण पणे समर्थन आहे। कारण या कार्यक्रमातून होणारं उत्पन्न भारतातील खेळाडू आणि ऑलम्पियन्स ला जाणार आहे। त्या मुळे भारतातील विभिन्न भागांत खेळ एक्टीविटीज ना प्रोत्साहन मिळेल।त्या म्हणाल्या 'ही एक मोठी संकल्पना आहे और ह्याचा प्रचार भारताच्या विभिन्न भागांत होतो आहे। मी पुण्याच्या लोकांना खरचं दाद देते कि ज्यांनी सकाळी एकत्र येवून 'हरित आणि स्वस्थ भारत' या संकल्पनेला प्रतिसाद दिला। याच उत्साहानी ही मोहीम येणार्या काही हप्त्यात मोठं स्वरूप घेईल, याची मला खात्री आहे। या आयोजनाला 'एथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया' तर्फे पण भरपूर प्रतिसाद मिळाला। पुण्याहून सुरू झालेल्या ह्या १० के इंटेंसिटी दौड चे पुढचे पाऊल इंदौर शहरात पडणार आहे। ही दौड १ ऑक्टोबर २०१७ रोजी होणार असून विजेत्यांसाठी अनुक्रमे ३५ हजार, २५ हजार आणि १० हजार रूपयांचा पुरस्कार निधि ठेवण्यात आला आहे। या रन बद्दल बोलताना भूतपूर्व ओलंपियन आणि 'एंडी इंवेंट मैनेजमेंट' चे संस्थापक आणि संचालक श्रीयुत आनंद मेंजीज म्हणाले कि ' ही सफल दौड होती। मी एंडी इंवेट मैनेजमेंट च्या वती नी सगळ्या खेळाडुंचा आभारी आहे। मी त्या सर्वांना धन्यवाद देतो ज्यांनी देशाला हरित आणि निरोगी ठेवण्याचा संकल्प सोडला आहे। ह्यात भावनेनं आम्ही इंदौर मध्ये ही दौड १ ऑक्टोबर २०१७ रोजी आयोजित करूं। १०के इंटेंसिटी दौड इंडियन ओलं पियन एसोसिएशन (भूतपूर्व ओलंपिक खेळाडुंची संस्था) ह्यांचा सहयोगानं आयोजित झाली। ते ह्याचे चैरिटी पार्टनर असून ह्या दौड मधून होणारं उत्पन्न त्यानांच देण्यात येईल। ही रक्कम भूतपूर्व आणि वर्तमान ओलंपिक खेळाडुंसह नवोदित खेळाडु मध्ये विभागत येईल। या रकमे नं एक भक्कम पायभूत यत्रंणा उभी करण्यास मदत मिळेल। ह्या मुळे न केवळ वर्तमान खेळाडुंना प्रेरणा मिळेल परंतु देशात भावी ओलंपियन्स पण तयार होतील। पुण्याहून सुरू झालेली ही १० के इंटेंसिटी रन आता इंदौर, भुवनेश्वर, हैदराबाद, चेन्नई, बेंगलुरू, मुंबई, बरोडा, दिल्ली होत याची सांगता ११ फेब्रुअरी २०१७ रोजी गोव्यात होइल। या सर्व शहरांमध्ये होणार्या१० के इंटेसिटी दौड च्या विजेत्यांसाठी ५० लाखांची ची रक्कम ठेवण्यात आली आहे।

**निकाल:**

१० के पुरुष विजेते: करण सिंग ३२.५ मिनिटे, प्रह्लाद सिंग ३२.६ मिनिटे, स्वप्निल सावंत ३२.७ मिनिटे

महिला विजेती: प्रियांका चाउरकर ४१.५६ मिनिटे, संपदा बुचडे ४२.४४ मिनिटे, विनया मालुसरे ४३.१९ मिनिटे।

# पुण्यात 'स्वाईन फ्लू'चे ३५ रुग्ण व्हेंटिलेटरवर

**पुणे (प्रतिनिधी) :** पुणे शहरातील 'स्वाईन फ्लू'च्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून सध्या ३५ रुग्ण व्हेंटिलेटवर आहेत. मागील काही दिवसांपासून व्हेंटिलेटरवरील रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने याचा धोका अधिक वाढला आहे.'स्वाईन फ्लू'मुळे आतापर्यंत पुण्यात मोठ्या




संख्येने पॉझिटिव्ह रुग्ण सापडले आहेत. पावसाळा, दमट वातावरण हे या विषाणूच्या प्रादूर्भावासाठी पोषक ठरत असल्याने या रुग्णांची संख्या वाढत आहे. आज (रविवारी) महापालिकेने विविध रुग्णालयात ११२ रुग्णांचे स्क्रिनिंग केले. त्यापैकी ४ जणांना टॅमिफ्लू दिल्या. सध्या शहरातील विविध रुग्णालयात स्वाईन फ्ल्यू चे ६१रुग्ण पॉझिटिव्ह आहेत. त्यातील ३५ जणांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे.

# अनानच्या निमित्ताने ओंकार-प्रार्थनाचा नृत्याविष्कार!



**मुंबई (प्रतिनिधी) :** सध्या एकापेक्षा एक अशा सूर मधुर गाण्यांमुळे सर्वत्र चर्चेचा विषय असलेल्या 'अनान' या आगामी मराठी चित्रपटातील भगवान शंकरांच्या द्विभुज स्वरुपाचे दर्शन घडवणारे 'तांडव' नुकतंच सोशल मीडियावर प्रदर्शित झाले आहे. 'गंधी सुगंधी' आणि 'एक सूर्य तू' या दोन्ही हिट गाण्यांनंतर आता ओंकार शिंदे आणि प्रार्थना बेहेरे या नवीन दमदार जोडीचा नृत्याविष्कार आपल्याला या तांडव द्वारे पाहायला मिळणार आहे.शिव रुद्र आणि शिव नटराज असे तांडवाचे दोन प्रकार म्हणजेच भगवान शिव शंकरांचे रौद्ररूपाचे प्रतीक असलेले शिव रुद्र तांडव आणि त्यांच्या आनंदी क्षणातील सौम्य रूपाचे प्रतीक असलेले शिव नटराज तांडव आपल्याला अनानच्या निमित्ताने पाहायला मिळणार आहेत. तोडीस तोड असलेले ओंकार शिंदे आणि प्रार्थना बेहेरे यांच्या उत्कृष्ट अशा सदाबहार नृत्याचा आस्वाद आपल्याला ह्याद्वारे घेता येणार आहे.'अनान' चित्रपटातील इतर सर्व गाण्यांप्रमाणेच 'तांडव' देखील दिग्दर्शक राजेश कुष्टे यांच्या लेखणीतून अवतरलेले असून सौरभ–दुर्गेश ह्या संगीतकार जोडीने ते संगीतबद्ध केलेले आहे. तर स्वराधीपती रवींद्र साठे यांच्या मधुर स्वरांनी त्याला साद घातली गेलेली आहे. 'रोहन थिएटर्स' चे रौनक भाटीया आणि हेमंत भाटीया यांनी 'अनान' या चित्रपटाची निर्मिती केलेली असून कथा आणि क्रिएटीव्ह डिरेक्शन हेमंत भाटिया यांचं आहे. दिग्दर्शन राजेश कुष्टे यांनी केलेलं आहे तर पटकथा–संवाद राजेश कुष्टे आणि मुकेश जाधव यांनी लिहिले आहेत. चित्रपटाचं संकलन सेजल पेंटर यांनी केलं असून छायाचित्रण राज कडूर यांनी केलं आहे.लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातील रवींद्र साठे यांच्या मधुर स्वरांनी सजलेल्या या स्वरमधुर मैफिलीचा आस्वाद तुम्हीही नक्की घ्या.

# शनिवारपेठेत गेल्या बारा तासांपासनू ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर

**पुणे (प्रतिनिधी) :** पुणे महापालिकेपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या शनिवार पेठेत रहिवासी भागात गेल्या १२ तासापासून ड्रेनेजमधून दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर पसरले आहे. त्यामुळे या ठिकाणच्या रहिवाश्यांना त्रास सहन करावा लागत असून महापालिका प्रशासन मात्र सुस्तावल्याचेचित्र आहे.शनिवारपेठेत ड्रेनेजच्या झाकणातून काल रात्रीपासून पाणी ओव्हरफ्लो होत आहे. यामध्ये १०–१२ दुचाकी घसरल्या आहेत. यासाठी पोलिसांनी सुरक्षितता म्हणून बॅरिगेड्स लावले आहेत. त्यामुळे पाणी परिसरात साचले आहे. सध्या साथीचे रोग पसरत असून रहिवासी भागात असे दुर्गंधीचे पाणी साचले आहे. रस्त्यावर पसरलेले पाणी अपघात किंवा साथींचे रोग नागरिकांच्या जिवाशी येवू शकते मात्र महापालिकेने मात्र याबाबत कानावर व डोळ्यावर हात ठेवले की काय अशी शंका नागरिक व्यक्त करत आहेत. स्मार्ट होऊ पाहणा–या पुण्याने मेट्रो, स्मार्ट सिटी प्रमाणे आता नागरिकांच्या मुलभूत सुविधांवरही लक्ष देणे गरजेचे आहे.

# स्लोआन स्टीफन्स : नवी ग्रँड स्लॅम चॅम्पियन



**न्यूयॉर्क :** अमेरिकेची बिगरमानांकित स्लोआन स्टीफन्स अमेरिकन ओपनच्या महिला एकेरीची नवी विजेती ठरली आहे. स्लोआन स्टीफन्सने अमेरिकेच्याच मॅडिसन कीजचा ६–३, ६–० असा धुव्वा उडवून, महिला एकेरीच्या विजेतेपदावर आपलं नाव कोरलं.



**पुणे (प्रतिनिधी):** 'ग्रंड पेरेंटन्स डे'चे औचित्य साधून केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी आज (१० सप्टेंबर) त्यांची नात आरोही हिच्या समवेत शनिवारवाडा, लाल महाल आणि विश्रामबागवाड्याला भेट दिली. यावेळी श्री जावडेकर यांनी या ऐतिहासिक स्थळांचा इतिहास व महत्व नातीला समजावून सांगितले.

आजी–आजोबांचे जीवनात अनन्यसाधारण महत्व असते. ते नातवंडांची काळजी घेतच असतात. नातवंडांना आजी–आजोबांचे पाठबळ महत्वाचे असते. आपल्याला मिळालेली जबाबदारी अधिक सजगपणे पार पाडण्याची आवश्यकता असल्याचे मत श्री. जावडेकर यांनी व्यक्त केले.

# व्यवसायात ग्राहकांच्या प्रतिक्रिया महत्त्वाच्या: सौ.झेलम चौबळ

**पुणे (प्रतिनिधी):** देआसरा फाउंदेशन तर्फे या वर्षी प्रथमच 'उत्कृष्ट उद्योजक पुरस्कार २०१७'आयोजित करण्यात आला होता. आपल्याक्षेत्रात लक्षणीय कामगिरी करणाऱ्या उद्योजकाना पुरस्काराने गौरवीत करण्यात आले.हा कार्यक्रम शनिवार,दि. ९ सप्टेंबर २०१७ रोजी देवांग मेहता सभागृह,भागीरथ,सेनापती बापट रोड,पुणे येथे पार पडला .नवीन व्यवसाय करू इच्छिणाऱ्याना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहनदेण्यासाठी देआसरा फॉऊंडेशन कायमच कार्यरत असते.या कार्यक्रमात पुण्यातील पाच नामांकित व यशस्वी उद्योजकांना पुरस्कार देण्यात आले.यात पी.एन गाडगीळ ज्वेलर्स चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.सौरभ गाडगीळ,चितळे बंधू चे संचालकश्री.श्रीकृष्ण चितळे,केसरी टूरच्यासंचालिका सौ.झेलम चौबळ,चोरडिया फूड चे व्यवस्थापकीय संचालक श्री.प्रदिप चोरडिया आणि –इड ऋळींपर्शीी थशश्रश्रपर्शीी उर्श्रील चे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक श्री.अभिमन्यू साबळे यांना या पुरस्काराने गौरवीत करण्यात आले.या कार्यक्रमात वरील सर्व व्यावसायिकाची मुलाखत घेन्यासाठी श्री विश्वास महाजन होते. पुरस्कार झाल्या वर श्री.सौरभ गाडगीळ यांनी आपल्या पारंपरिक चालत आलेल्या व्यवसयाचा अनुभावतुन असे सांगितले की विचार खरे आणि पक्के असतील तर व्यवसाय नक्कीच यशश्वी ठरतो.त्याच बरोबर लोकांचा गरजे नुसार आपल्या व्यवसायात सुधारणा कारणे देखील आवश्यक आहे यात श्री.श्रीकृष्ण चितळे यांनी आपला व्यवसाय पुण्यात व जगात कसा वाढवला या बद्दल सांगताना ते म्हणाले की व्यवसयात हीशोब हा चोख व पारदर्शक असला पाहिजे.याच बरोबर जगाची माहिती करून घेणे देखील महत्वाचे आहे. या पुढे ते असेही म्हणाले की प्रत्येक व्यवसाय हा सुरुवातीला छोटाच असतो तो हळू हळू मोठा होत जातो,याच बरोबर इतर व्यवसायीकांशी चांगले संबंध ठेवणे देखील गरजेचे आहेसौ.झेलम चौबळ या निम्मित म्हणाल्या की,व्यवसाय करताना आपल्या सहकार्यान बरोबर चांगले संबंध टीकावन गरजेचा असता.आणि ग्राहकांचा प्रतिक्रियां मुळेच व्यवसाय हा जास्त प्रगत होत जातो व या मुळेच चांगल्या सुविधा आपल्या मार्फत त्यांचा पर्यंत पोहोचतात.श्री.अभिमन्यू साबळे हि या निम्मित असे म्हणाले की एखादा व्यवसाय जिद्दीनी सुरु करायला हवा आणि त्या विषयी चे सखोल ज्ञान मिळवून त्यात उतारणे आवश्यक आहे.

# ट्रेनमध्ये टीप मागणे ४८ तासांत बंद करा; पीयूष गोयलांचे फर्मान



**नवी दिल्ली :** सुरेश प्रभू यांच्याकडूने रेल्वे मंत्रालयाची जबाबदारी येताच नवनिर्वाचीत रेल्वमंत्री पीयूष गोयल चांगलेच कामाला लागले आहेत. सूत्रे हाती येताच गोयल यांनी पहिला दणका रेल्वेप्रवासादरम्या प्रवाशांकडून घेतल्या जाणाऱ्या टीप आणि अतिरिक्त पैसे घेणऱ्या कर्मचाऱ्यांना दिला आहे.रेल्वे प्रवासादरम्यान, टीप स्वरूपात किंवा इतर कोणत्याही स्वरूपात अतिरिक्त पैसे घेण्याचा प्रकार येत्या ४८ तासात बंद करा, असे फर्मान गोयल यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांना सोडले आहे. जे कर्मचारी या सूचनांचे पालन करणार नाहीत, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल असा सक्त इशाराही गोयल यानी दिला आहे.दरम्यान, रेल्वेमंत्री आणि रेल्वेमंत्रालयाकडून आलेल्या आदेशानंतर IRCTC ही खडबडून जागे झाले आहे. त्यांनी आपल्या कॅटरिंग कॉन्ट्रॅक्टर्सना तशा सूचना दिल्या असून, आदेशांचे पालन करण्यास सांगितले आहे. जे कर्मचारी रेल्वेमंत्रालयाच्या या आदेशाचे उल्लंघन करतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. येत्या सोमवारपासून, रेल्वे कॅटरींग इन्स्पेक्टर्स रेल्वेत प्रवाशांकडून अतिरिक्त पैसे वसूल केले जाऊ नयेत म्हणून बारीक लक्ष ठेऊन असतील.

# स्वस्त धान्य दुकानात मिळणार गॅस सिलेंडर

**मुंबई (प्रतिनिधी):** आता स्वस्त धान्य दुकानांमधून पाच किलोचे गॅस सिलिंडर देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. याशिवाय खुल्या बाजारात रॉकेलची विक्री करण्यासचीही परवानगी दिली आहे. अशी माहिती अन्न औषध व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभागमंत्री गिरीश बापट यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.शिधापत्रिकेवर वाटपासाठी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला रॉकेलचा पुरवठा केला जातो. त्यासाठी केंद्र सरकारकडून अनुदान उपलब्ध करून दिले जाते. मात्र गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकारने रॉकेलच्या अनुदानात कपात केली आहे. तसेच राज्य सरकारला मंजूर करण्यात येणाऱ्या दर महिन्यांच्या कोट्यातही कपात करण्यात आली आहे. परिणामी स्वस्त धान्य दुकानदारांना राज्य सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून दरमहा होणारा पुरवठा कमी झाला आहे.स्वयंपाक आणि दिवाबत्ती व्यतिरिक्त अन्य कामांसाठी रॉकेलचा वापर करण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे अनुदानित रॉकेलवरील ताण कमी करण्यासाठी आणि वाढत्या मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी खुल्या बाजारात रॉकेलची विक्री करण्यास स्वस्त धान्य दुकानदारांना परवानगी देण्याचा विचार राज्य सरकारच्या पातळीवर सुरू होता. त्यानुसार या दुकानदारांना रॉकेल आणि सिलिंडरची विक्री करण्यास मान्यता देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे खुल्या बाजारात रॉकेलसह पाच किलो वजनाचे सिलिंडरची विक्री करणे या दुकानदारांना आता शक्य होणार आहे. यासाठी काही घाऊक पुरवठादार म्हणजेच एसकेओ एजंट्स यांनी रेशन दुकानदारांना या वस्तु पुरविण्याची तयारी दर्शविली. ऑइल कंपन्यांकडून निश्चित करण्यात आलेल्या निकष व मार्गदर्शक सूचना पूर्ण करणाऱ्यांना रॉकेलचा पुरवठा करण्यात येणार आहे. असं श्री बापट यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.